न्यायालयीन प्रकरणांबाबत घ्यावयाची दक्षता

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी**

**विद्यापीठ परिपत्रक.क्रमांक** : अेपीडी/न्या.प्र./२०१६

कृषि नगर, परभणी – ४३१ ४०२

दिनांक १२ सप्टेंबर २०१६

विद्यापीठ प्रशासनाच्या असे निर्दशनास आले आहे की, मा.उच्च न्यायालयाच्या तसेच कामगार, औद्योगिक व जिल्हा न्यायालयाच्या आदेशाची विहित कालमर्यादेत अंमलबजावणी न झाल्यामुळे अवमान याचिका अथवा वरिष्ठ न्यायालयात याचिका दाखल होत आहेत. तसेच काही प्रकरणांमध्ये अर्थिक स्वरुपाचा दंड लादला जाणे तसेच न्यायालयीन कार्यवाहीस सामोरे जावे लागते ही बाब भुषणावह नसुन त्यामधुन संबंधित अधिकाऱ्याचा हलगर्जीपणा स्पष्ट होत आहे. अशा प्रकरणाच्या अवमान याचिका टाळण्याकरीता व न्यायालयीन प्रकरणामध्ये विभागाकडून योग्य व कालमर्यादेत कार्यवाही होण्यासाठी सर्व नियंत्रण अधिकारी /विभाग प्रमुख /कार्यालयीन प्रमुख तसेच प्रशासनाच्या आस्थापना व इतर शाखांना खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. नोंदणी / आवक-जावक शाखेने त्यांचेकडे प्राप्त झालेली न्यायालयीन प्रकरणाविषयीची कागदपत्रे त्याच दिवशी नियंत्रण अधिकारी /विभाग प्रमुख /कार्यालयीन प्रमुख यांच्या निर्दशनास आणून द्यावीत जेणेकरुन प्रकरणात विलंब टाळता येईल.
२. अवमान याचिकेची नोटीस प्राप्त झाल्यास त्याबाबतची सविस्तर वस्तुस्थिती तात्काळ प्रशासनाच्या निर्दशनास आणुन द्यावी.
३. प्रकरणामध्ये विद्यापीठ प्रशासनाने अधिकार पत्र दिलेल्या अधिकाऱ्यांनी अथवा प्रकरणामध्ये प्रतिवादी असलेल्या अधिकाऱ्यांनी प्रकरणाच्या सुनावणीच्या दिवशी वेळेवर न्यायालयात हजर रहावे तसेच सुनावणीच्या वेळी न्यायालयाने केलेली निरिक्षणे, तोंडी आदेश/सुचना तसेच विद्यापीठ विधिज्ञांनी सुचित केलेल्या बाबी प्रशासनाच्या निर्दशनास आणून द्याव्यात.
४. न्यायालयीन प्रकरणातील प्रतिवादी तसेच प्रशासनाने ज्यांना अधिकार पत्र दिलेली आहेत त्यांनी विद्यापीठ विधीज्ञाशी संपर्कात राहून प्रकरणांतील तारीख निहाय प्रकरणाची सद्यस्थिती व विधीज्ञास आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देऊन प्रकरणात वेळीच परिच्छेदनिहाय अभिप्राय व प्रतिज्ञापत्र दाखल करावेत व त्याची एक प्रत प्रशासनास उपलब्ध करुन द्यावी. प्रकरणात विलंब / हलगर्जीपणा होत असल्याचे निर्दशनास आल्यास आर्थिक दंडाची रक्कम संबंधित अधिकाऱ्याकडून वसुल करण्यात येईल तसेच त्यांना जबाबदार धरण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.
५. न्यायालयीन निर्णयाच्या / आदेशाच्या अनुषंगाने संबंधित विधीज्ञाचे अभिप्राय घेऊन अपील दाखल करण्याची कार्यवाही विहित कालमर्यादेत करावी. जर मा.न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द विद्यापीठ प्रशासनास अपीलात न जाण्याचा निर्णय घेतला असेल तर अशा निर्णयाची/आदेशाची विहित कालमर्यादेत अमलबजावणी करावी म्हणजे न्यायालयाच्या अवमानास सामोरे जाण्याची वेळ येणार नाही.
६. न्यायालयीन निर्णयाची / आदेशाची विहित कालमर्यादेत अमलबजावणी करणे शक्य होत नसल्यास मा.न्यायालयाकडून मुदतवाढ मिळण्यासाठी अर्ज दाखल करण्यात यावा.

सदर विद्यापीठ परिपत्रक विद्यापीठाच्या www.vnmkv.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

मा.कुलगुरू यांच्या मान्यतेने व आदेशानुसार

कुलसचिव